# पुणे विद्यापीठ

संदर्भ : परीक्षा/एम.कॉम./३० | दिनांक : २.३.२०१२

## परीक्षा फॉर्मविषयी महत्वाची सूचना

सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, एम.ए.आणि एम.कॉम. एप्रिल/मे, २०१२ मध्ये होणा-या परीक्षेसाठीचे फॉर्म ऑन लाईन एन्ट्री पध्दतीने भरावयाचे आहेत. या संदर्भातील सूचना आपल्या महाविद्यालयात लावावयाची आहे. तसेच सदरील भरलेले ऑन लाईन फॉर्मची प्रिंट आऊट व योग्य शुल्क विद्यार्थ्यांकडून स्वीकारावे. तसेच ऑन लाईन भरलेला फॉर्म तपासून घेऊन टर्म ग्रँट झाली की नाही ते पाहून फॉर्म महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून जमा करुन घ्यावे. विद्यार्थ्यांनी ऑन लाईनच्या फॉर्मच्या अंतिम दिनांकापर्यन्त महाविद्यालयांत जमा करावी. महाविद्यालयाने २००८ **Pattern Regular (Semi Patt.)** विद्यार्थ्यांचे फॉर्म मॅन्युअली स्वीकारु नये. ऑन लाईन प्रिंटेड कॉपी बरोबर लागणारे मार्कशिट व अन्य आवश्यक कागदपत्र असल्यास विद्यार्थ्यांनी जोडलेली असावी. त्याबरोबर प्रिंटेड कॉपीवर जे परीक्षा शुल्क असेल ते विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात अंतिम दिनांकापर्यंत भरावयाची आहे. महाविद्यालयाने पूर्वीच्या पध्दतीप्रमाणे आवश्यक कागदपत्रे जोडून घ्यावयाची आहेत

अंतिम दिनांकानंतर विद्यापीठाकडून आपल्या महाविद्यालयाच्या ई-मेल आयडीवर ऑन लाईन फॉर्म भरलेल्या विद्यार्थ्यांची यादी पाठविली जाईल. त्याची प्रिंट आऊट महाविद्यालयाने काढून घ्यावी. जमा झालेले सर्व फॉर्म महाविद्यालयांनी नंबरप्रमाणे लावून सर्व फॉर्मची मिळून एकूण शुल्काचा डी.डी.विद्यापीठाच्या नावाने काढावा. तसेच एम.कॉम. परीक्षेचे फॉर्म सिरियल नंबरप्रमाणे लावून विद्यापीठात जमा करावेत. एकूण शुल्काचा डी.डी. तसेच विद्यापीठाकडून अंतिम दिनांकानंतर महाविद्यालयानुसार मिळालेल्या प्रिंटेड लिस्टिंगवर दुरुस्त्या करुन विद्यापीठात जमा करण्यात यावा. प्रथमच ऑन लाईनची सुविधा करण्यात आली असून कोणतीही त्रुटी आढळल्यास विद्यापीठाच्या निदर्शनास आणून द्यावी ही विनंती.

## परिपत्रक - विद्यार्थी व महाविद्यालयासाठी सूचना

### फॉर्म ऑन लाईनविषयी माहिती पुढीलप्रमाणे

#### महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना द्यावयाच्या सूचना

१) ऑन लाईन फॉर्म भरण्यासाठी विद्यार्थ्यांजवळ स्वतःचा ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे. नसल्यास विद्यार्थ्यांनी कोणत्याही साईटवर तयार करुन घ्यावा. **(eg-rediff.Com,Yahoo.Com.gmail.Com)** अथवा महाविद्यालयाचा ई-मेल आयडी नमूद करावा.

२) ऑन लाईन फॉर्म भरण्यासाठी इंटरनेटव्दारे खालील लींकचा वापर करुन एम.कॉम.परीक्षा सिलेक्ट करावी.

**Examforms.unipune.ac.in**

३) अधिकृतरित्या ऑन लाईन फॉर्म दिनांक २.३.२०१२ पासून दुपारी ३.०० वाजता वरील वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

४) वरील लिंकवर विद्यार्थ्यास स्वतःचा **login ID** तयार करता येईल. तो व त्याचा पासवर्ड विद्यार्थ्यास त्याने नमूद केलेल्या ई-मेल आयडीवर पाठविण्यात येईल.

५) फॉर्मवरील * निर्देशित केलेले **Fields Compulsory** (अनिवार्य) भरावे लागणार आहेत.

६) विद्यार्थ्यांनी ऑन लाईन भरलेल्या फॉर्मची प्रिंटआऊट, पूर्वीच्या मार्कस्टेटमेंटची झेरॉक्स कॉपी व आवश्यक असल्यास अन्य कागदपत्रे व प्रिंटेड फॉर्मवर निर्देशित केलेली फी ची रक्कम महाविद्यालयामध्ये अंतिम दिनांकापर्यंत अदा करावी.

(७) विद्यार्थ्याने आपल्या अर्जाची हार्ड कॉपी महाविद्यालयाकडेच सादर करणे आवश्यक आहे. सदर अर्जावर सर्व नियमांनुसार कार्यवाही पूर्ण करुन सर्व कागदपत्रांसहित, शुल्कांसहित विद्यापीठाकडे सादर करावयाची आहे.

(८) विद्यार्थ्यांनी ऑन लाईन फॉर्म भरताना Optional Subject काळजीपूर्वक तपासून विषय निवडावा.

(९) ऑन लाईन फॉर्म भरताना Submit Form केल्यावर जर Submit होत नसेल तर भरलेला पूर्ण फॉर्म तपासून ज्या फिल्डला लाल अक्षरात एरर मेसेज आला असेल तर त्या फिल्डची माहिती व्यवस्थित भरावी मग Submit करावे.

(१०) ज्या विद्यार्थ्यांनी पूर्वीच (एप्रिल/मे, २०१२ या परीक्षेसाठी) शुल्क अदा करुन फॉर्म महाविद्यालयात जमा केला असेल अशा विद्यार्थ्यांनी फक्त ऑन लाईन फॉर्म भरावा. व प्रिंटआऊट महाविद्यालयात जमा करावे. त्यांनी पुन्हा शुल्क भरु नये.

**<u>कॉलेजसाठी सूचना :</u>**

१) ऑन लाईन फॉर्म फक्त सेमिस्टर पॅटर्न रेग्युलर विद्यार्थ्यांसाठी आहेत. M.Com. २००२ पॅटर्नचे फॉर्म पूर्वीच्याच पध्दतीने विद्यापीठात पाठवावयाचे आहेत. सर्व C.I.S विद्यार्थ्यांनी फॉर्म पूर्वीच्याच पध्दतीने पाठवावे.

२) महाविद्यालयांनी ऑन लाईन प्रिंटेड फॉर्म विद्यार्थ्यांकडून जमा झाल्यावर सिरियलप्रमाणे लावून विद्यापीठात अंतिम दिनांकापर्यंत जमा करावे.

३) परीक्षा अर्ज भरण्याच्या शेवटच्या तारखेनंतर महाविद्यालयनिहाय डाटाची प्रत विद्यापीठामार्फत महाविद्यालयांना मेल/ प्रत्यक्ष / किंवा नगर/नाशिक सेंटर येथे उपलब्ध करुन देण्यात येईल. ही प्रत प्रत्यक्ष अर्जावरुन तपासून फक्त ज्या विद्यार्थ्यांची फी जमा झालेली आहे त्यांचेच अर्ज विद्यापीठात एकत्रित फी च्या डी.डी.सहित अंतिम दिनांकापर्यंत जमा करावेत.

४) महाविद्यालयांनी त्यांना वरील प्रकारे मिळालेली डाटाची प्रत प्रत्यक्ष अर्जावरुन तपासून ज्या विद्यार्थ्यांची फी जमा झालेली आहे असेच अर्ज विद्यापीठाच्या फी सहित व विद्यार्थ्यांच्या अर्जावर मा.प्राचार्यांची सही घेऊन विद्यापीठात जमा करावयाचे आहेत. तसेच विद्यापीठातून प्राप्त झालेल्या डेटाच्या प्रतीवर (Hard Copy) ज्या विद्यार्थ्याने फी भरलेली नाही त्यांच्या नावापुढे delete अशी अक्षरे लाल शाईमध्ये लिहून पाठवावीत. नावात किंवा विषयात बदल करावयाचा असेल तर तो सुध्दा याच डाटाच्या प्रतीवर मूळ डेटावर गोल करुन त्याच्या खाली योग्य बदल करावा. नंतर नाव किंवा विषय इ. चे बदल स्वीकारले जाणार नाहीत.

५) ज्या विद्यार्थ्यांची टर्म ग्रँट झालेली आहे अशाच विद्यार्थ्यांचे अर्ज विद्यापीठास पाठवावेत.

६) ज्या विद्यार्थ्यांना टर्म ठेवून पुढच्या सेमिस्टरचे फॉर्म भरावयाचे असतील त्यांनी महाविद्यालयाशी संपर्क साधून जुन्या पध्दतीने फॉर्म भरावा.

७) एम.कॉम. २००८ सेमिस्टर पॅटर्नचा ऑन लाईन फॉर्म विद्यार्थ्यांसाठी दिनांक **१.३.२०१२** ते **१०.३.२०१२** पर्यंत विनाविलंब शुल्क पध्दतीने फॉर्मची मुदत राहील. तसेच दिनांक **११.३.२०१२** ते **१६.३.२०१२** पर्यंत विलंब शुल्कासह फॉर्म जमा करण्याची मुदत राहील. महाविद्यालयाने विद्यापीठाकडून हार्ड कॉपी मिळाल्यानंतर आठ दिवसात दुरुस्तीसहीत डी.डी. व फॉर्म दुरुस्तीसहित यादी जमा करण्यात यावी.

2/3/12

उपकुलसचिव
(छाननी व तालिनीकरण-परीक्षा विभाग)